

# लाडोबा

डॉ. नितीन मोरे

# लाडोबा

## (बाल नाटिका संग्रह)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# लाडोबा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा. सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# लाडोबा

लेखकः- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

कव्हर फ़ोटो- सुनीळ सामंत

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान -:

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- १४ नोव्हेंबर २०२२ (बालदिन)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे चव्वेचाळीसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# लाडोबा

डॉ. नितीन मोरे

थोड्याच वेळाच्या भेटीमध्ये मनात घर करून राहिलेल्या

***चि.****अनय*

यास सप्रेम

# अनुक्रम

१.

उठा आता उठा

२.

दात घासा दात

३.

न्हाऊचे गाणे

४.

खेळ थोडा वेळ

५.

मी कुठ्ठेय?

६.

अंगाई गोष्ट

१.

# उठा आता उठा !

**बाबा :**

**ॲलेक्सा म्हणते**
**उठा आता उठा आता**
**सकाळीची सकाळ झाली**
**ॲलेक्सा म्हणते**
**एका गोड मुलाची**
**छान किती झोप झाली..**

**मुलगा:**

**झोपू देना माला बाबा**
**झोप माझी नाही झाली..**

**बाबा :**

**ॲलेक्सा म्हणते**

**बघा बघा अंगावर**

**कोवळी कोवळी उन्हं आली**

**ॲलेक्सा म्हणते**

**सूर्य पण उठला आणि**

**जमिनीवर आला खाली**

**मुलगा :**

**कायतरी काय सांगतो बाबा**

**सूर्य कधी का येतो खाली?**

**बाबा :**

**ॲलेक्सा म्हणते**

**फुलं पानं झाडं आणि**

**उठले सगळे बघ सगळे पक्षी**

**ॲलेक्सा म्हणते**

पानातून सूर्यकिरणांनी

जमिनीवर बघ काढली नक्षी

ॲलेक्सा म्हणते

उठा आता उठा

आळस गेला झोप झाली

ॲलेक्सा म्हणते

झटका झटकन आळस बिळस

उठा पटकन झोप गेली

**मुलगा :**

असं काय रे बाबा माला

झोपू देना थोडं अजून

दहा मिंटांनी उठेन ना मी

उठव मला मिंटं मोजून ..

**बाबा :**

**ॲलेक्सा म्हणते**

**चटचट उठा आता**

**पहाट गेली सकाळ झाली**

**ॲलेक्सा म्हणते**

**दात घास दूध पी**

**खेळायला जाऊ खाली ..**

**ॲलेक्सा म्हणते**

**चल सायकल चालवूया**

**तयार हो पटपट झटपट**

**ॲलेक्सा म्हणते**

**गट्टम करा दूध सारे**

**ताकद बघ येईल दसपट**

**मुलगा :**

**असं काय रे बाबा तू**

**नक्की खेळायला ना माला नेशील**

**तुला डब्बल सीट घेईन**


**सायकलीवर तू माझ्या येशील?**

**माझी ना संपली सगळी झोप**

**तयार होतो मी झटपट झटपट**

**नवीन माझी सायकल फास्ट**

**तू पण बाबा तयार हो पटपट..**



२.

# दात घासा दात

**मुलगा :**

**ए बाबा बाबा**

**सांग माला**

**प्राणी का दात घासतात**

**म्हायती का तुला?**

**बाबा :**

**माहितीय मला**

**सांगू का तुला?**

**मुलगा :**

**तुला म्हायतीय?**

**वाघ आणि सिंहोबा पण घासतो दात?**

**त्याची आई त्याच्या पण मागे लागते**

**मग जातो बाथरूमात?**

**बाबा :**

**ऐक सांगतो गंमत त्यांची**
**गंमत सगळ्याच प्राण्यांची**

**सिंहाकडे पण ब्रश असतो**
**त्याने तो दात घासतो**

**हत्तीकडे एक फडकं असते**
**हत्तीण त्यानेच दात घास घास घासते**

**उंटोबा बसतात घालून मांडी**
**कंटाळा आला तर मारतात दांडी**

**गाय म्हणते चारा खाऊन**
**होतात दात साफ**

**मोठाली दांडी घेऊन**

**दात घासतो जिराफ**

**वाघीण म्हणते, मारला हरीण**

**दात तर घासा**

**वाघाची पिल्लं बसतात**

**हसत ओरडत घसा**

**~मुलगा :**

**पण बाबा तू सांग हे**

**तू कधी पाह्यलं**

**माझंच मग बघायचं**

**कसं काय राह्यलं**

**बाबा तुझ्याशी मी कट्टी**

**बारा मैने बोलू नको**

**एकटा एकटा गेला पाह्यला**

**माला घेऊन जायला नको?**

**आईला सांगणार तुझं नाव**
**माला न घेता गेला**
**रागावलाय मी तुझ्यावर**
**जा पिणार नाय दुधाचा पेला**

**बाबा :**

**बाप रे.. आता काय होणार**
**एक कोणी रुसलंय खूप**
**आमच्या एका माकडाच्या**
**शेपटाला शेरभर तूप**

**फुगलीत कशी बघा**
**सफरचंद गालाची**
**बाप रे बाप समजूत आता**
**कशी काढावी बाळाची**

**सॉरी रे, पुढच्या वेळी**

**नक्की घेऊन जाईन**

**सगळ्या प्राण्यांना तुला**

**नक्की भेटवून देईन..**

**मुलगा :**

**प्रॉमिस? नक्की ना मी येणार**

**सगळ्या प्राण्यांना भेटणार**

**मग मी पण त्यांना**

**शिकवेन घासायला दात**

**ऐकलं नाय माझं तर**

**ओरडेन मी जोरात**

**दात नाय घासले तर**

**किडतील ना दात**

**म्हणून रोजरोज घासायचे**

**दात सगळ्यांनी जोरात**

**है किनाही बाबा**

**सांग ना रे बाबा**

**बाबा:**

**जंगलात तो जाईल नि**

**प्राण्यांना शिकवेल**

**शहाणा माझा बाळ, तो पण**

**रोज छान दात घासेल**



## ३.

# न्हाऊचे गाणे

**बाबा :**

**चल खेळू पाण्यात**
**घुसा घुसा घुसा**
**अंगावर ओतू पाणी**
**भसा भसा भसा**

**हे बघ किती मळलायस तू**
**असा कसा जसा**
**साबण लावून चोळेन तुला**
**खसा खसा खसा**

**बाळ :**

**कायतरी बाबा तू बोलतो**
**असा कसा कसा**
**कालच ना रे आंघोळला मी**
**तसा तसा तसा**

**कपडे घालून खेळला मी**
**उघडा नाय काय असा**
**कसा काय मळणार मी**
**तसा तसा तसा?**

**तुझ्या अंगावर मी पाणी**
**टाकणार असा असा असा**
**मग बाबा तू पण म्हणणार**
**कसा कसा कसा**

**बाबा :**

**लावतो थोडाच साबण तुला**

**नाय पसा पसा पसा**

**मग पाण्यात खेळत**

**बसा बसा बसा**

**छान छान खेळू पाण्यात**

**बस असा बसा**

**मस्त गाऊ गाणे उघडून**

**घसा घसा घसा**

**डोळ्यात नाय जाणार साबण**

**कसा कसा कसा**

**न्हाऊ न्हाऊ मस्त होईल**

**हसा हसा हसा**

**न्हाऊ होऊन गोरा पिट्ट**

**दिसतो असा ससा ससा**

**आईला जाऊन दाखव साफ**

**जणू ससा कसा जसा**

**बाळ :**

**ए बाबा कायतरीच काय**

**मी हाय का ससा ससा ससा?**

**उगाच काय कुणालातरी**

**म्हणा फसा फसा फसा?**



## ४.

# खेळ थोडा वेळ

**मुलगा :**

**चल ना बाबा**
**खेळू खेळ**
**वाट बघतो ना**
**मी कित्ती वेळ**

**आॅफिसातून तू**
**कित्ती उशिरा येतो**
**मला ना सांगू कित्ती**
**कित्ती कंटाळा येतो**

**बाबा :**

**खेळू म्हणतोस**

**तर थोडाच वेळ**

**पण तू खेळणार**

**कसला रे खेळ?**

**मुलगा :**

**मी बाबा चँपियन आहे**

**आनि तुला मी हारवणारै..**

**चल खेळू ब्याट अन बॉल**

**मी पा सिक्सर मारणारै**

**बाबा :**

**बाप रे तू तर**

**मला आज हरवणारेस?**

**ब्याटने मारशील सिक्सर**

**तू मला धाववणारेस?**

**मुलगा :**

**बाबा मी ना कोली हाये**

**तू बॉल टाक बघ**

**मी बघ मारतो शाॅट**

**कित्ती लाम जातो बघ..**

**माझ्यात किनाही**

**आज खूप ताकद आहे**

**कारण किनाही मी खूप**

**भाजी खाल्ली आहे**

**चल लौकर कर ना बॉलिंग**

**मग बघ कित्ती मजा येईल**

**मारेन्ना बॉल इतक्या जोरात**

**तो किनाही चांदोबावर जाईल**

**बाबा :**

**भाजी खाल्ली आहेस तू म्हणजे**
**नक्कीच असणार शक्तिमान**
**बापरे.. मला हरवणारच हा**
**दिसतोयस कसा सुपरमॅन**

**मुलगा :**

**बॉल नको मला पकड मला पकड**
**पक्डापक्डी खेळू चल**
**मी धाव्तो इक्त्या जोरात**
**तू माझ्या मागे पळ**

**मी किनाही आज गुड बॉय होतो**
**म्हणून मीच आज जिंकणारे**
**मग हैना धावताना शोद मला**
**मी हैना तिकडे लपणारै**

**मी त्या झाडापाठी लपणार**

**तुला हैना दिसणारच नाय**

**शोदशील शोदशील बाळ माझा**

**अरेच्चा कुठे लपला हाय..**

**बाबा मी हैना हाये त्या झाडामागे**

**तुला म्हायती ते नसणार**

**इकडे शोद तिकडे शोद**

**शोधूनशोधून बाबा दमणार**

**बाबा :**

**हरलो बुवा मी शोधूनशोधून**

**सोन्या माझा कुठे गेला बरे**

**शोधून काढेल त्याला जो कोण**

**त्याला प्राईझ देईन खरे**

**मुलगा :**

**हे! हे! हे! हे!**

**पा बाबा माझा हारला**

**बाबाला कायच नाय्ये ताकद**

**शोदून शोदून दमला**

**मी का जिंकला म्हायतीये कारण**

**आई म्हणते मी आज शाणा होतो**

**भाजी खाल्ली पोळी खाल्ली**

**हट्ट पण नाय केला, मी गुडबॉय होतो**

**आता आपण खेळू दुसरे**

**रिंग रिंग खेळू चल आता**

**रिंगा रिंगा रोझेस म्हणतो मी**

**चल रिंग टाक तू आता**

**मी पकडेन बघ कॅच अस्सा**

**तू टाक रिंग माझ्या हातात**

**आणि हैना मी टाकेन्ना रिंग**

**जाईल थेट आभाळाच्या आत**

**बाबा :**

**दमला असशील खेळून राजा**

**चल आता, जाऊ जाऊ करू**

**रात्र होत आली आता**

**हात जोडून शुभंकरोति करू**

**मुलगा :**

**बाबा, आपण खेळू सापशिडी**

**माला घरी ना एक ना खाऊ दे**

**लवकर चल ना घरी जाऊया**

**शक्तिमान मी, माला उचलून घे..**

५.

# मी कुठ्ठेय?

**(मुलगा.. वय वर्ष पाच. खेळून घरी येतो. समोर आपल्या बाबाला पाहून हाताने डोळे मिटून घेतो.. )**

**मुलगा:**

**हुं .. ओळख पाहू**

**कोण मी सांग त पाहू..**

**मी मिटतो डोळे..**

**म्हंजे मी नाय कुणालाच दिसणार**

**कुणालाच नाय दिसणार**

**मग कोण मला ओळखणार?**

**बाबा:**

**आमच्या या घरात**

**आलंय कोण?**

**आलंय कोण?**

**मांजराच्या पावलांनी**

**दबकत दबकत**

**शिरलंय कोण?**

**शिरलंय कोण?**

**कुणीतरी आहे**

**गोजिरवाणा गोड**

**इतका गोड गोड**

**जणू आंब्याची फोड..**

**कोण बरं असणार?**

**मी ओळखतो..**

**मी नाही फसणार..**

**हां.. तू तो तिकडचा**

**म्हणजे पलिकडचा**

**म्हणजे तो रे त्याचे लांब पाय**

**अरे अरे आठवतो.. नाव त्याचे काय?**

**तो रे.. तो.. त्याचे काय नाव..**

**हां.. तो .. कर्णाव अर्णाव ..**

**म्हणजे तो अर्णव ..**

**मुलगा:**

**छे! हे! हे! फसला बाबा**

**बाबा फसला..**

**मी काय अर्णव नायच मुळी**

**ओळख नायतर मी गुपचिळी**

**बाबा:**

**अरे बाप रे.. कठीण काम हे तर मोठे**

**आता दिसतच नाही तर शोधू कोठे..**

**तरीही बघू या..**

**इतका गोड कोण?**

**साखरेचं ते पोतं कोण?**

**साखर आहे की गुळाची ढेप?**

**ओळखतो मी ही दुसरी खेप..**

**कोण बरं कोण बरं**

**आता ओळखतोच बघ तर खरं ..**

**आवाज त्याचा मधासारखा**

**बोलतो गोडगोड पोपटासारखा**

**मिठू मिठू आहे तो गोड**

**खातो कशी पेरूची फोड**

**नाव त्याचे मिठू मिठू**

**मिठू म्हणजे विठू विठू**

**तो कोपऱ्यावरचा कोण बरं**

**नाव कसा विसरलो .. सांगतर खरं..**

**मुलगा:**

**हे! हे! म्हंजे तू हरला!**

**मी जिंकला तू हारला ..**

**बाबा:**

**थांब रे सोन्या मोन्या**

**थांब रे लाडवाच्या गोण्या..**

**थांब रे जिलब्या**

**थांब गुलाबजाम्या**

**थांब रे श्रीखंड्या थांब**

**म्हायतीय मला कोण आहे..**

**त्याच्या पावलांची मला सय आहे..**

**तोच तो ज्याचे लांब नाक आहे एक**

**आणि आहेत दोन कान..**

**दोन हात पाय दोन**

**गोड गळ्यातून घेतो एक तान..**

**मुलगा:**

**काय रे बाबा नुसताच बोलतोस**

**नाव कशाला नाही सांगतोस ..**

**उगाच कशाला बोलतो गोल गोल ..**

**लवकर सांग नायतर हरला बोल..**

**बाबा:**

**सॉरी रे राजा..**

**वाजवतो बाजा**

**एका मुलाची आहे मजा..**

**माहितीय मला तू आहेस कोण**

**शहाणा बाळ तो आणि कोण**

**नाव तुझे सांगू का?**

**मग हारला हारला म्हणशील का?**

**तू तर आहेस तो अर्णवचा मित्र**

**नाव तुझे ठाऊकै.. सौमित्र ..**

**मुलगा:**

**हॅत्तिच्या.. नायच मुळी..**

**आता मी आळीमिळी**

**आईला मी सांगणार**

**आई मग तुला ओरडणार**

**बाबाला कायपण येत नाय**

**मी लपलाय ते कळतच नाय**

**एकदा अर्णव, एकदा सौमित्र बोलतो**

**मी त्याला दिसतोच नाय.. कितीपण शोधतो..**

**बाबा हारला.. बाबा हारला**

**मी जिंकला.. मीच जिंकला..**

**पण नाय.. अजून एक चान्स**

**म्हंजे मी करणार डान्स ..**

**बाबा:**

**ओके राजा.. चान्स शेवटचा**

**बघ हां.. मी नाही हरायचा**

**आता बघच मी ओळखतो कसा**

**कोण आहे हा.. कासव की ससा..**

**की आला कोणी वाघोबा ..**

**नाही नाही .. नक्कीच सिंहोबा**

**की हत्ती आहे तो सोंडवाला?**

**का जिराफ लांबमानेच्या तोंडवाला?**

**नायतर असणार झेब्रा पट्टेवाला**

**की आहे कुणी बैल मोठ्ठी शिंगवाला?**

**की भू भू कुत्रा .. नाय मनीमाऊ**

**की तो हिरवागार पोपट पेरूखाऊ?**

**हरीण तर नाही ना.. की कबूतर आहे**

**थांब हां.. मी ओळखतोच आहे**

**हां दिसला मला.. मी पाहतोच आहे..**

**दुसरा कोणी नाहीच.. अरे हा तर घोडा आहे**

**टबडग टबडग घोडा आहे.. घोडाच आहे..**

**मुलगा:**

**काय बाबा.. तुला येत नाय कायपण**

**आई म्हणते ते खरे.. कधी यील शाणपण**

**मी काय प्राणी हाये की पक्षी हाये**

**तू हारला सांगतर, तुला कळतच नाये ..**

**बाबा:**

**अरे बाप रे.. मी हरला की काय?**

**कोण बरे सांग की तू.. मला दिसलाच नाय..**

**मुलगा:**

**हे! हे! हारला बाबा!**

**बाबा हारला ..**

**उघडतो आता डोळे बाबा मी..**

**मग तुला दिसेन मी..**

**पण हारला हुप्प**

**बसला गुप्प ..**

**बाबा आमचा**

**चिडीचुप्प..**

**मी बघ तर आहे कोण?**

**बघ ना बाबा, मी आहे कोण?**

**बाबा:**

**उघडले का डोळे तू..**
**आता मला दिसला तू**
**तू तर आमचा बाळोबा आहेस..**
**सगळ्यांचा लाडोबा आहेस ..**



## ६.

# अंगाई गोष्ट

**बाळ :**

**बाबा नाही झोप येत**

**सांग ना गोष्ट.. सांग ना**

**बाबा :**

**दमला माझा सोन्या**

**खूप खेळला माझा सोन्या**

**झोप येत नाही**

**तर चल गोष्ट सांगू काही..**

**कसली बरं सांगू?**

**कसली बरं सांगू?**

**राजाची की राणीची**

**की राजकन्येची?**

**की परिराणी की**

**दुसऱ्या कुठच्या देशाची?**

**नाहीतर मग गोष्टीत**

**असतील कोणी प्राणी**

**बोलतील ते तुझ्याशी**

**म्हणतील की गाणी**

**अकबर नि बिरबल**

**नाहीतर मग येतील**

**येतील आणि तुला ते**

**गाढ झोपवून जातील**

**शिवाजी महाराज येतील**

**टपटप टाकत टापा**

**झोपेल मग बाळ माझा**

**घेईन त्याचा पापा**

**बाळ :**

**सांग ना कुठची तरी छान छान**
**काल सांगली ना तशी नको ल्हान ल्हान**

**बाबा :**

**मोठ्ठी सांगू गोष्ट**
**त्यात काय हवे सांग?**
**आयडिया.. गोड गोष्ट सांगतो**
**मग मुंग्यांची लागेल रांग..**

**ऐक हां.. एक असतो राजा**
**त्याची भलतीच असते मजा**
**रोज खातो गुलाबजाम**
**रोज खातो खाजा**

**सकाळी उठला की**

**खातो जिलब्या चार**

**बुंदीचा लाडूही**

**आवडतो त्याला फार**

**दूधबिध पीत नाही**

**बासुंदी ओरपतो नुसती**

**म्हणतो मी शक्तिमान**

**करा माझ्याशी कुस्ती ..**

**जेवणाची वेळ झाली**

**की नुसतीच तूपसाखर**

**पोळी नको भाजी नको**

**म्हणतो मला नको भाकर**

**जेवायला बसतो रात्री**

**तर श्रीखंड फक्त हवे**

**गोड गोड खाणे फक्त**
**हवे रोज रोज नवे**

**असा असतो राजा**
**गोडखाऊ नुसता**
**येईल का सांग ताकद त्याला**
**भाजी पोळी नसता?**

**गोड गोड खाऊन**
**किडतात त्याचे दात**
**दुखतात इतके की**
**खाता येत नाही भात**

**बाळ :**

**पण त्याची आई का**
**नाही त्याला ओरडत?**
**रोज रोज गोड गोड**

**कशाला त्याला भरवत?**

**बाबा :**

**काय सांगू राजा**

**हट्टी असतो फार**

**गोड गोड नाही तर**

**उपाशी राहिल फार..**

**आई म्हणते बाळ**

**माझा उपाशी राहिल**

**मग तो दुसऱ्या दिवशी**

**शाळेत कसा जाईल?**

**बाळ :**

**बाबा तुझी चूक चूक**

**कायतरीच सांगतो**

**शाळेत जायला राजा काय**

**छोटा थोडीच असतो?**

**बाबा :**

**आणि आईचं ऐकत नाही**

**म्हणजे राजा वेडा असतो..**

**अरे राजा म्हणून**

**रोज रोज पेढा खात बसतो..**

**बाळ :**

**आता सांग ना दुसरी..**

**अजून एक सांग**

**बाबा:**

**म्हणजे काय**

**गोष्टींची लावू रांग?**

**दुसरी सांगू म्हणतोस**

**अरे, पहिली कुठे संपली**

**राजाची गंमत सगळी**

**सांगून कुठे संपली?**

**मग काय होतं सांगू?**

**बाळ :**

**नको वेड्या राजाची सांगू..**

**अजून दुसरी सांग ना..**

**राक्षसाची सांग ना.**

**बाबा :**

**अरे, सांगितली कालच ती तर**

**आवडली ना तुला ती**

**परत परत आज तीच**

**सांगू काय तुला ती?**

**बरं ऐक सांगतो..**

**एक राक्षस असतो**

**सगळ्या लोकांना तो**

**घाबरवत असतो..**

**असतात त्याला तीन डोकी**

**आणि शिंगं दोन**

**सांग असल्या भयंकराला**

**घाबरणार नाही कोण?**

**आला राक्षस तिकडून**

**दाणदाण पावलं टाकत**

**बाळ :**

**तसं नाय काय बाबा**

**ढाणढाण पावलं टाकत**

**बोल्ला तू काल**

**बाबा :**

**बरं ढाणढाण पावलं टाकत..**

**आणि जोरजोरात**

**शाळेतला अभ्यास घोकत..**

**बे एके बे ..**

**तीन दुणे सहा ..**

**बे एके बे..**

**तीन दुणे सहा..**

**तीन दुणे सहा..**

**अरे माझ्या बाळाने**

**डोळे मिटले पहा..**

**(त्याची पापी घेत..)**

**बाळ झोपला शांत**

**डोळ्यांत आली झोप**


**इवल्याशा डोळ्यात वाढतेय**

**स्वप्नांचे रोप..**



डॉ. नितीन मोरे यांची ४०+२ प्रकाशित पुस्तके

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल

































चक्रमादित्याचा दरबार
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0





डॉ. नितीन मोरे
चक्रमादित्याचा दरबार



चक्रमादित्याचा दरबार


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
ऐसाभी होता है





डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
वाळूतील रेषा



राजा दरबारी
डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच


डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या



डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे






डॉ. नितीन मोरे
घरात


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
सांगतो ऐका



डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे


छ..छ..म..



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस



डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची 'परी' कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे


Jackson!


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २


सुलट
डॉ. नितीन मोरे

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे चव्वेचाळीसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभिरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात.  त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४३), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर

सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३७), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२२), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(५) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(५), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(३), मंगेश चौधरी, बंकटलाल जाजू(३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं "इ"यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

esahity@gmail.com

www.esahity.com

9869674820 (for free books on whatsapp)